महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!



महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हॉट्सॲप करा.



महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार








छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : १४५ वा | दिनांक : ०३/०३/२०२५ | वार : सोमवार


## सोमवारपासून राज्याच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाला सुरुवात



**मुंबई :** राज्याचा अर्थसंकल्प उद्यापासून सुरू होणार आहे. तसेच अधिवेशनापूर्वी सत्ताधाऱ्यांकडून चहापानाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे. या कार्यक्रमावर विरिधकांनी बहिष्कार टाकण्यात आला आहे. महाविकास आघाडीची आज पत्रकार परिषद पार पडली, या पत्रकार परिषदेत चहापानाच्या कार्यक्रमावर बहिष्कार टाकण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यावेळी शरद पवार गटाचे जितेंद्र आव्हाड, ठाकरे गटाचे अंबादास दानवे आणि आदित्य ठाकरे उपस्थित होते.

यावेळी बोलताना अंबादास दानवे म्हणाले, वाल्मीक कराडला व्हीआयपी ट्रीटमेंट दिली जात आहे. काही जिल्ह्यांमध्ये दारूबंदी आहे, गडचिरोली जिल्ह्यात, वर्धा जिल्ह्यात दारूबंदी असताना देखील दारूबंदीबाबत सात हजार गुन्हे दाखल झाले आहेत. महिलांवरील अत्याचाराच्या घटना वाढल्या आहेत. मालाडमध्ये, बदलापूरमध्ये, अमरावतीमध्ये घटना घडल्या. या सगळ्या घटनांवर सरकार गंभीर नसल्याचा आरोप अंबादास दानवे यांनी केला आहे.

पुढे बोलताना अंबादास दानवे म्हणाले, संतोष देशमुख यांची हत्या झाली, त्यामधील आरोपी कृष्णा आंधळे अजूनही पकडला जात नाही, ही घटना नऊ डिसेंबरला झाली आहे. आज दोन मार्च उगवलेला आहे. तीन महिने झाले असतानाही हा आरोपी पकडला जात नाही. या गावाचे दुर्दैव असे की या गावातील लोकांना उपोषणाचा निर्णय घ्यावा लागतो. हे सर्व घडत असताना कोरटकर नावाची मस्ती आलेली व्यक्ती ही कोणाशी संबंधित आहे? असा सवाल अंबादास दानवे यांनी उपस्थित केला. अंबादास दानवे म्हणाले, इंद्रजित सावंत यांच्यासारख्या इतिहास संशोधकाला धमकी देते. आणि दुसरीकडे प्रशांत कोरटकरांना सरकार संरक्षण देते. म्हणजे हे सरकार कोणत्या दिशेने चालले आहे, आतापर्यंत त्यांना अटक करायला पाहिजे होती. कृषी विभागात मोठा घोटाळा झाला आहे, आरोग्य विभागाचे जे टेंडर निघाले होते त्याला स्थगिती देण्यात आली आहे. एसटीचे जे तेराशे दहा बसेसचे टेंडर निघाले होते, त्यालाही स्थगिती देण्यात आली आहे.

दरम्यान, यावेळी शिवसेना ठाकरे गटाचे आमदार व युवसेनाप्रमुख आदित्य ठाकरे यांनी देखील महायुती सरकारवर टीका केली आहे. आदित्य ठाकरे म्हणाले, आज ते सत्तेत आहेत उद्या आम्ही सत्तेत येऊ. आम्हाला पद नव्हे तर राज्याचे हित महत्त्वाचे आहे, असे यावेळी आदित्य ठाकरे म्हणाले आहेत.






## नीतिमत्तेच्या आधारावर धनंजय मुंढे यांनी राजीनामा द्यायला पाहिजे - रामदास आठवले



**नाशिक :** मंत्री धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याची सध्या चर्चा सुरू आहे. अंजली दमानिया यांनी देखील धनंजय मुंडेंच्या राजीनाम्यासाठी सोमवारपर्यंत अल्टीमेटम दिला आहे. सोमवारपर्यंत धनंजय मुंडेंचा राजीनाम न घेतल्या पेटून उठू, असा इशारा अंजली दमानिया यांनी दिला. तर करुणा मुंडे यांनी तर ३ मार्च रोजी धनंजय मुंडेंचा राजीनामा होईल, असा दावाच केला. यावर केंद्रीय मंत्री यांनी प्रतिक्रिया दिली. मस्साजोगचे संतोष देशमुख हत्या प्रकरणी धनंजय मुंडे यांनी नैतिकतेच्या आधारे राजीनामा द्यायला पाहिजे, असे केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांनी म्हटले आहे. अजितदादांनी याबाबत विचार करणे आवश्यक असल्याचेही आठवले म्हणाले. ते नाशिक येथे माध्यमांशी बोलत होते.

बीडमधील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख् हत्या प्रकरणी सीआयडीने १५०० पेक्षा जास्त पानांचे आरोपपत्र दाखल केले आहे. धनंजय मुंडे यांचा निकटवर्तीय वाल्मीक कराड हाच या हत्येमागचा मास्टरमाइंड असल्याचा दावा आरोपपत्रात करण्यात आला आहे. वाल्मीक कराडला मुख्य सुत्रधार म्हटल्याने धनंजय मुंडे यांच्या अडचणी वाढल्या आहेत. धनंजय मुंडे यांनी राजीनाम द्याव अशी मागणी जोर धरत आहे. विविध राजकीय पक्षांच्या नेत्यांनीही मुंडेंच्या राजीनाम्याची मागणी केली आहे. महायुतीच्याही काही नेत्यांकडूनही धनंजय मुंडेंचा राजीमाना घ्यावा, अशी मागणी होत आहे. यामुळे धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याबाबत राजकीय दबाव वाढत आहे.

करुणा मुंडे आणि धनंजय मुंडे यांचे काय संबंध आहेत हे सगळ्यांना माहिती आहे. करुणा मुंडे यांना माहिती मिळाली असेल तर मला त्याबद्दल माहिती नाही. एक गोष्ट खरी आहे की, वाल्मिक कराडच्या सांगण्यावरून संतोष देशमुखचा मर्डर केल्याची सगळी माहिती सीआयडीला मिळाली, असे रामदास आठवले म्हणाले.

मला असे वाटते की, धनंजय मुंडे आणि वाल्मीक कराड यांचा मोठ्या प्रमाणात जवळचा संबंध होता. पण, या कोणाशी काही संबंध नसेल असे काय पुरावेही नाही. परंतु धनंजय मुंडे यांनी राजीनामा द्यावा ही मागणी आहे. अजितदादांनी याबाबत विचार करणे आवश्यक आहे. खुनाच्या प्रकरणामध्ये धनंजय मुंडे यांचा कसलाही संबंध नाही. पण, खुनातील आरोपी जवळचा होता. नीतिमत्तेच्या आधारावर धनंजय मुंडे यांनी राजीनामा द्यायला पाहिजे, अशी मागणी रामदास आठवले यांनी केली.

धनंजय मुंडेंच्या राजीनाम्याबाबत अजितदादा पवार यांनी निर्णय घेतला पाहिजे, असेही त्यांनी म्हटले. संतोष देशमुख हत्या प्रकरण आणि सोमनाथ सूर्यवंशी या प्रकरणावर धनंजय मुंडे यांची भूमिका दुटप्पी असल्याचे देखील रामदास आठवले म्हणालेत.

रामदास आठवले यांनी रक्षा खडसे यांच्या मुलीच्या छेडछाड प्रकरणावरही प्रतिक्रिया दिली. रक्षा खडसे यांच्या मुलीची छेड काढण्याचा प्रयत्न केला असेल ही बाब गंभीर असल्याचे ते म्हणाले या प्रवृत्ती ठेचून काढायला सर्वांनी एकत्र काम केले पाहिजे. रक्षा खडसे यांच्या मुलीची छेड काढणे ही अत्यंत अयोग्य बाब आहे. तक्रार दिल्यानंतर आरोपी पकडले जातील. विरोधकांचे म्हणणे खरे असले तरी याच्यात राजकारण करण्याची गरज नाही. पोलिसांनी ॲक्टिव्ह राहणे महत्त्वाचे आहे. कायदे असले तरी सुद्धा समाजामध्ये कायदे मोडणारे असंख्य लोक आहेत, अशी प्रतिक्रिया त्यांनी दिली.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार ०३ मार्च २०२५


## जीवन आणि साहित्य वेगवेगळे करता येणार नाही - डॉ. वासुदेव मुलाटे




**कन्नड (अरूण थोरात) :** साहित्यात जीवनाचे प्रतिबिंब उमटावे, जीवन आणि साहित्याला वेगवेगळे करता येणार नाही. असे मत जेष्ठ साहित्यिक डॉ. वासुदेव मुलाटे यांनी व्यक्त केले आहे. ते दि. ०१ मार्च रोजी, सहकार महर्षी बाळासाहेब पवार सा.वाचनालय कन्नड येथे आयोजित कविवर्य ज्ञानेश्वर गायके यांच्या पेरणी कविता संग्रहाच्या प्रकाशन समारंभ प्रसंगी बोलत होते. माणसात जिद्द नसेल तर आयुष्य संपते, जीवनाला वगळून साहित्य निर्मिती होऊ शकत नाही. प्रत्येक माणूस हा एक कवी, लेखक असतो. अनाहूत पणे आलेले एखादे वाक्य कविता बनू शकते. साहित्य लेखन ही एक कला आहे. असे मत ही डॉ. मुलाटे यांनी व्यक्त केले.कार्यक्रमाचे आयोजन भाषा साहित्य संस्कृती संशोधन परिषद कन्नड, बालकुमार साहित्य संस्था पुणे शाखा कन्नड यांनी केले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अ‍ॅड कृष्णा पाटील जाधव तर प्रमुख अतिथी म्हणून जेष्ठ साहित्यिक डॉ. रमेश सुर्यवंशी, डॉ. अंबादास सगट, डॉ. रंगनाथ लहाणे, प्राचार्य विजयजी भोसले आदींची उपस्थिती होती.

प्रास्ताविक तिफणकार डॉ शिवाजी हुसे यांनी तर सुत्रसंचलन प्रविण दाभाडे यांनी केले. 'जो पर्यत मानव जात आहे तो पर्यत साहित्याचा श्वास राहिल, माणसाचे माणुसपण जीवंत आहे तो पर्यत साहित्य निर्मिती होत राहील' असे व्याख्याते रंगनाथ लहाणे यांनी व्यक्त केले. डॉ. शिवाजी हुसे यांनी तालुक्यातील साहित्य चळवळीचा मागोवा घेतला. डॉ. अंबादास सगट यांनी आपल्या भाष्या तून 'पेरणी तील कविता शेती मातीशी इमान राखणार्या आहेत. 'शास्त्रांतून कविते कडे पाहू नये, पेरणी कविता संग्रहाचे जातमुळ गाव समाज शेतीमाती आहे. कन्नड तालुक्याची ओळख कवितांचा तालुका म्हणून झाल्याचे' नमूद केले. आभार प्रदर्शन साहित्यिक डॉ. रामचंद्र झाडे यांनी केले.

याप्रसंगी डॉ. रमेश सुर्यवंशी यांना राज्य शासनाचा पुरस्कार मिळाल्याबद्दल सत्कार करण्यात आला. यावेळी सागर जाधव, प्राचार्य मतसागर, विरा राठोड, ना. तहसिलदार दिलीप सोनावणे, व्याख्याते डॉ संजय गायकवाड, डॉ यशवंत पवार, ग्रंथालय सचिव रामकृष्ण पवार, सुभाष काळे, दत्ता मोरसक, महेंद्रसिंग राजपूत, प्रा. केशरचंद राठोड, भगवान लहाणे, सुभाष काळे, प्रभात शेळके, अशोक गायकवाड, संदीप वाकडे, शुभदा देवरे, अरुण थोरात, सुरेश औटे, अरविंद पदमे, रामेश्वर मोरे, शिवनाथ गायकवाड, आदींसह साहित्यिक, नागरिक उपस्थित होते.

## ९८ व्या अ.भा.म.साहीत्य संमेलनात, दिल्ली येथे झाला कवी माणिक सोनवणे यांचा सत्कार



**न्यु दिल्ली :** अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे सरहद पुणे-दिल्ली आयोजित ९८ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन २३ फेब्रुवारी २०२५ रोजी, छत्रपती शिवाजी महाराज साहित्य नगरी तालकटोरा स्टेडियम न्यू दिल्ली येथे ऐतिहासीक रूपाने पार पडले. या दिल्ली येथे झालेल्या ९८ व्या अ.भा.म.साहित्य संमेलनात कवी माणिक सोनवणे यांना आमंत्रित करून त्यांचा सत्कार करण्यात आला.

कवी माणिक सोनवणे हे मु. पो.ता. सोयगांव जि. छ. संभाजीनगर येथील रहेवाशी आहेत, ते त्यांच्या गावबोली भाषेत ग्रामीण साहित्य लिहीत असतात, आणि साहित्य संमेलनाच्या व्यास पिठावर कवितेचे गाऊन सादरीकरण करत असतात.

अशीच त्यांच्या गावबोली भाषेतील पाऊसपाणी नावाच्या ग्रामीण कवितेची निवड अ.भा.मराठी साहित्य मंडळाने केली होती. आणित्यांची पाऊसपाणी कविता सादर करण्यासाठी ९८ व्या अ.भा.म. साहित्य संमेलनाच्या कविकटा या व्यासपिठावर कविता सादर करण्यासाठी त्यांना आमंत्रित करण्यात आलेले होते. तर तेथे ही त्यांनी त्यांच्या कवितेचे सादरीकरण करून, प्रमुख पाहुण्यांची व ऐकणाऱ्या श्रोत्यांची मने जिंकण्यात कुठलीच कसर सोडली नाहीत. तर सोयगांव येथील कवी माणिक सोनवणे यांना अ.भा.मराठी साहित्य संमेलनाच्या कवीकट्टा या व्यासपिठावर पुष्पगुच्छ व सन्मानचिन्ह अ.भा. मराठी साहित्य मंडळाच्या अध्यक्षाप्रा.उषा तांबे, व संस्थापक सरहद -पुणे अध्यक्ष संजय नहार, तर अ.भा.मराठी साहित्य मंडळाचे सदस्य राजन लाखे यांच्या हस्ते देऊन सन्मानित करण्यात आले.

तर अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या श्रीमंत सयाजीराजे महाराज गायकवाड सभा मंडपाच्या विचारपिठावर ही कवी माणिक सोनवणे यांचा सत्कार, अखिल भारतीय मराठी साहित्य परिषदेचे राष्ट्रीय अध्यक्ष व (शरदचंद्रजी पवार गट,) राष्ट्रवादी पक्षाचे प्रदेश प्रवक्ते डॉ. शरद जी गौरे यांच्या हस्ते सन्मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले.

या दिल्ली येथे संपन्न झालेल्या ९८ व्या अखिल भारतीय मराठी सहित्य संमेलनाचे उद्धाटक पंतप्रधान नरेंद्रजी मोदी, प्रमुख पाहुणे देवेंद्रजी फडवणीस, आणि स्वागताध्यक्ष शरदचंद्रजी पवार, तर संमेलन अध्यक्ष प्रा.ताराबाई भवाळकर ह्या लाभलेल्या होत्या.

## ठाण्यात दोन्ही शिवसेनेचे नेते आमने-सामने



**ठाणे :** शिवसेना ठाकरे गटाचे नेते आज ठाण्यात दाखल झाले होते. यावेळी राज्यसभेचे खासदार संजय राऊत यांनी स्वर्गीय आनंद दिघे यांच्या प्रतिमेला हार घातला व अभिवादन केले. मात्र, याला शिवसेना शिंदे गटाचे नेते व कार्यकर्त्यांनी जोरदार निषेध व्यक्त केला. यावेळी तणावपूर्ण परिस्थिती निर्माण झाली होती. ठाकरे आणि शिंदे गटाचे कार्यकर्ते आमने सामने आल्याचे पाहायला मिळाले.

गद्दार आमचे असेच स्वागत करणार, असा टोला यावेळी संजय राऊत यांनी लगावला होता. तसेच आमचा एवढा धसका कशासाठी आहे? उद्धव ठाकरे यांचा ठाण्यात दबदबा आहे हे त्यांना दिसून आले आहे म्हणून त्यांना धडकी भरली आहे, अशी प्रतिक्रिया विनायक राऊत यांनी दिली आहे. यावेळी केदार दिघे देखील उपस्थित होते.

ठाण्यात शिवसैनिकांचा सुसंवाद असा कार्यक्रम आहे, या कार्यक्रमासाठी शिवसेना ठाकरे गटाचे नेते ठाण्यात दाखल झाले आहेत. शिवसेना ठाकरे गटाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांशी सुसंवाद साधण्याचा कार्यक्रम ठाण्यात आयोजित करण्यात आला आहे. या कार्यकर्मापूर्वी ठाकरे गटाच्या नेत्यांनी आनंद दिघे यांच्या प्रतिमेला हार घालत अभिवादन केले.

या घटनेनंतर शिवसेना शिंदे गटाच्या नेत्यांनी आनंद दिघे यांच्या प्रतिमेला दुधाचा अभिषेक केला आहे. तसेच खासदार नरेश म्हस्के यांनी देखील संजय राऊत यांच्यावर टीका केली होती. संजय राऊत यांच्या लेखामुळे आनंद दिघे यांच्यावर टाडा लागला होता व तुरुंगात जावे लागले होते. त्यामुळे संजय राऊत यांनी आनंद दिघे यांच्या प्रतिमेला हार घालण्याची भाषा करू नये, असा इशारा नरेश म्हस्के यांनी दिला होता.

खासदार नरेश म्हस्के म्हणाले, खोपकर हत्याकांडा नंतर संजय राऊत यांनी लोकप्रभामध्ये एक लेख लिहिला होता. त्या लेखामुळे आनंद दिघे यांना टाडा लागला. त्यांना तुरुंगात जावे लागले. आता त्या संजय राऊत यांनी दिघे साहेबांना हार घालायची भाषा करू नये. काशिनाथ घाणेकर नाट्यगृहाला आनंद दिघे यांचे नाव देण्याला विरोध करणाऱ्यांनी दिघे साहेबांचा पुतळ्याला पुष्पमाळ घालायची भाषा करू नये.

पुढे बोलताना नरेश म्हस्के म्हणाले, महाभारतात धृतराष्ट्र यांच्या जोडीला संजय होते. त्यांना दिव्यदृष्टी होती. हे संजय जर स्वत:ला संजय समजत असतील तर त्यांनी जनतेच्या मनात काय आहे, त्याचाच विचार करावा. हे रात्रीच भांडुपच्या हातभट्टीची घेतात. त्यामुळे त्यांना स्वप्नातही एकनाथ शिंदे दिसतात. रात्रीची उतरली नसेल म्हणून सकाळी ते एकनाथ शिंदे यांच्याबाबत बोलले असतील. उद्धव ठाकरे आणि त्यांच्या नेतृत्वाखाली जो पक्ष आहे, ती शिल्लक सेना आहे. ही सेना त्यांनी सोनिया गांधींकडे गहाण ठेवली आहे. बाळासाहेबांचा हिंदुत्ववादी पक्ष सोनिया गांधींकडे गहाण ठेवला होता, तो एकनाथ शिंदे यांनी सोडवला.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार ०३ मार्च २०२५


## डॉ. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानच्या प्रेरणेतून जालना शहरात स्वच्छता अभियानाने केला विक्रम




**जालना :** महाराष्ट्र भूषण डॉ. नानासाहेब धर्माधिकारी यांच्या प्रेरणेतून संपूर्ण भारतभर स्वच्छता अभियानाची मोहीम डॉ. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान रेवदंडा ता. अलिबाग जि. रायगड या प्रतिष्ठानच्या वतीने राबविण्यात आली. आज या अभियानात संपूर्ण भारतभर लाखो करोडो श्री सदस्य यामध्ये सामील होऊन संपूर्ण भारतभर महा स्वच्छता अभियान राबविण्यात आले आहे. या अभियानामध्ये नागरिकांनी स्वयंप्रेरणेने सहभाग नोंदवून स्वच्छतेचे कार्य करावे असे आवाहन पद्मश्री डॉ. आप्पासाहेब धर्माधिकारी यांनी केले आहे.

जालना शहरात राबविण्यात आलेल्या स्वच्छता अभियाना बद्दलची संपूर्ण अधिक माहिती डॉ. केशव सोळंके यांनी दिली. आज जालना येथे स्वच्छता अभियानाची सुरुवात जालना बस स्थानक येथून जालना महानगरपालिकेचे आयुक्त माननीय श्री संतोष खांडेकर यांच्या हस्ते या अभियानाची सुरुवात सकाळी ९.३० वाजता करण्यात आली असून स्वच्छता अभियानास परिवहन मंडळाचे कर्मचारी, प्रतिष्ठानचे सर्व श्रीसदस्य व नागरिक यांनी एकत्र येऊन स्वच्छता अभियानास सुरुवात केली. प्रथम बस स्थानक जालना ते ढवळेश्वर अंतर ०३ किमी पर्यंत रस्त्याच्या दुतर्फे बाजूने संपूर्ण स्वच्छता करून , बस स्थानक परिसरामध्ये संपूर्ण स्वच्छता करण्यात आली असून मोठ्या प्रमाणावर कचरा गोळा करण्यात आला. त्यामध्ये सुका कचरा ५ हजार किलो तर ओला कचरा ३३०० किलो असा एकुण ८३०० किलो कचरा गोळा करण्यात आला असून त्यासाठी डॉ. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानच्या वतीने श्री बैठक ढवळेश्वर जालना येथील १०० श्री सदस्य , महानगरपालिकेतील कर्मचारी तसेच कचरा उचलण्यासाठी ०३ घंटा गाड्या, २ ट्रॅक्टर, १हायवा यामधून कचरा जालनाच्या बाहेर नेण्यात आला.

या अभियानात प्रतिष्ठानच्या वतीने सर्वश्री सदस्य, महानगरपालिकेतील कर्मचारी, शहरातील नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग घेऊन स्वच्छता अभियानामध्ये कार्य केले. जालना शहरात बस स्थानक, लक्कड कोट, भोकरदन नाका, आस्था हॉस्पिटल, जैन भवन रोड, ढवळेश्वर रोड, शतायु हॉस्पिटल परिसर, ढवळेश्वर संपूर्ण परिसरास स्वच्छता अभियान राबविण्यात आले. या उपक्रमामुळे शहर स्वच्छतामय, रस्त्यावरील कचरा गोळा केल्याने संपर्ण रस्ता साफ झाला तसेच बसस्थानक परिसर पूर्णपणे साफ करून साचलेली घान , कचरा, गोळा केल्याने, बसस्थानकातील प्रवाशांनी समाधान व्यक्त केले आहे.

## गुणवत्ता केवळ अपघात नव्हे तर ती एक तपश्चर्या आहे - प्राचार्य डॉ विजय भोसले




**कन्नड (अरुण थोरात) :** येथील शिवाजी महाविद्यालयात आज माजी विध्यार्थी व पालक मेळावा आयोजित केलेला होता. त्याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ विजय भोसले यांनी आपले मनोगत अध्यक्षीय समारोपात मांडले.तालुक्यातील अतिशय जुन्या शिवाजी वरिष्ठ महाविद्यालयात माजी विध्यार्थ्यांचा व पालकांचा प्रथमच एकत्र मेळावा आयोजित केलेला होता. यावेळी महाविद्यालयाचे वेगवेगळ्या क्षेत्रात उंच भरारी घेतलेल्या माजी विध्यार्थ्यानी उत्स्फूर्तपणे हजेरी लावली.

यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ विजय भोसले आपल्या अध्यक्षीय भाषणात म्हणाले की, विध्यार्थी हा महाविद्यालयीन जीवनात आयुष्याचे खरे धडे घेत असतो. याच काळात त्याला समाजातील चांगल्या वाईट गोष्टींची पारख होत असते. हे वय आहे ज्या वयात आपल्या संगतीचा परिणाम दिसून येत असतो. आमच्या महाविद्यालयाने उत्कृष्ट समाजात नाव मोठं करणारे विद्यार्थी घडविले याचा आम्हाला सार्थ अभिमान आहे. आपण समाजाचे जसे देणे लागतो तसेच आपल्या महाविद्यालयाचे सुद्धा काहीतरी देणे लागतो. या भावनेने आपण सर्वांनी गरीब होतकरू विध्यार्थ्यांना आपल्या माध्यमातून मदत म्हणा किंवा वेगळवेगळ्या क्षेत्रात मोठे झालेले आपण मार्गदर्शनरूपाने सुद्धा मदत करू शकता असे आव्हानही यावेळी केले.

त्यास माजी विध्यार्थ्यातून उत्तम प्रतिसाद मिळाला. याप्रसंगी महाविद्यालयाचा एक विध्यार्थी राजेंद्र नेवगे यांना यावर्षीचा महात्मा गांधी राष्ट्रीय पुरस्कार मिळाल्याबद्दल त्याचा सत्कार करण्यात आला. तसेच आलेल्या सर्व विध्यार्थ्यांचा सुद्धा सत्कार करण्यात आला. वेगवेगळ्या क्षेत्रात उंच भरारी घेणाऱ्या या विध्यार्थ्यानी यावेळी आपले मन मोकळे केले. आपल्या आठवणीना पुन्हा एकदा उजाळा दिला. यावेळी मंचवर डॉ. बी के मगरे, डॉ. मातेरे, प्रा राजेंद्र नेवगे उपस्थित होते. महाविद्यालयाचे डॉ. युसूफ शेख, डॉ. प्रतिभा अहिरे, डॉ. अनिल क्षीरसागर, डॉ. विजय मतकर, डॉ. प्रकाश महाजन, डी डब्ल्यू शिंदे, बी के मगरे, शेख युसूफ, आतिश मेहत्रे, बी. जी. देशमुख, पी के संघाई आदी शिक्षक उपस्थित होते. सोबतच प्रा. प्रकाश चव्हाण, नाना शिरसाठ, कृष्णा बडक, प्रा. सतीश राठोड, डॉ. मकरंद जोशी, राहुल दणके, कृष्णा बल्लाळ आदी विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. एस एम पवार यांनी तर आभार डॉ. राकेश अहिरराव यांनी मानले. कार्यक्रमाची सांगता स्नेह भोजनाने झाली.

## रक्षा खडसेंच्या लेकीची छेडछाड प्रकरण : टवाळखोर शिंदेंच्या शिवसेना आमदाराचे कार्यकर्ते, रोहिणी खडसे यांचा मोठा दावा

**जळगाव :** रक्षा खडसे यांच्या लेकीची जत्रेमध्ये काही समाजकंटकांनी छेडछाड केली होती. या घटनेमध्ये एका विशिष्ट पक्षाचे लोक असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले होते. मात्र तो विशिष्ट पक्ष कोणता? असा प्रश्न उपस्थित झाला होता. रक्षा खडसेंच्या मुलीची छेडछाड करणारे लोक एकनाथ शिंदेंच्या शिवसेना आमदाराचे कार्यकर्ते असल्याचा दावा, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या महिला प्रदेशाध्यक्षा रोहिणी खडसे यांनी केला आहे. एफआयआरमधे नाव असलेले अनिकेत भोई, पीयूष मोरे यांचे आमदार चंद्रकांत पाटील आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सोबतचे फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाले आहेत.

या घटनेमध्ये दुर्दैवाने एका विशिष्ट पक्षाचे पदाधिकारी असल्याची सांगितले. या लोकांनी अतिशय वाईट प्रकारचे काम केलेले आहे. पोलिसांनी गुन्हा दाखल केलेला आहे. काहींना अटक केलेली आहे. इतरांनाही अटक केली जाईल. कुठल्याही परिस्थितीत अशा लोकांना माफी देता कामा नये. त्यांच्यावर अतिशय कडक कारवाई होईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले होते. यानंतर रोहिणी खडसे यांनी ते लोक शिंदेंच्या आमदारांचे कार्यकर्ते असल्याचा दावा केला आहे.

देवेंद्र फडणवीस यांनी त्यांच्या वक्तव्यात असे म्हटले आहे की, आरोपी एका विशिष्ट पक्षाचे आहेत. त्यानंतर हे फोटो सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत. आरोपींचे एकनाथ शिंदे यांच्या सोबत फोटो आहेत, असा दावा रोहिणी खडसे यांनी केला. आरोपी सत्ताधारी पक्षाचे जरी कार्यकर्ते असले तरी त्यांनी कारवाईचे आदेश दिले, याबाबत मला देवेंद्र फडणवीस यांचे आभार व्यक्त करायचे आहेत. पण कारवाईचे आदेश देण्यापेक्षा लवकरात लवकर त्या मुलींना न्याय देण्यासाठी आणि भविष्यात अशा घटना घडवू नये, यासाठी देखील देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्रातील पोलिस अधिकाऱ्यांना सूचना करणे अपेक्षित आहे, असेही रोहिणी खडसे यांनी एका वृत्तवाहिनीशी बोलताना सांगितले.

सत्ताधारी पक्षाच्या आमदारांचे कार्यकर्त्यांची जर अशा छेडखानीच्या प्रकरणात नावे येत असतील. तर देवेंद्र फडणवीस यांनी कारवाई करण्याचे आदेश दिले हे स्वागतार्ह आहे. पण कडक कारवाई करणे अपेक्षित आहे. कदाचित सत्ताधारी पक्षाचे कार्यकर्ते आहेत, असे त्यांना उघडपणे मान्य करायचे नसेल. पण त्यांनी इतके तरी मान्य केले की ते विशिष्ट पक्षाचे कार्यकर्ते आहेत. आणि त्यांच्यावर कडक कारवाई झाली पाहिजे, यासाठी देवेंद्र फडणवीस यांचे कौतुकच करायला हवे, असेही रोहिणी खडसे यांनी म्हटले आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार ०३ मार्च २०२५


## कन्नडला निधी कमी पडू देणार नाही - पालकमंत्री आ. संजय शिरसाट



**कन्नड (अरुण थोरात) :** कन्नड तालुक्याचा मागील पाच वर्षाचा अनुशेष भरून काढण्यात येईल तसेच इथून पुढे कन्नड ला निधी कमी पडू देणार नाही कारण शिवसेनेचा कार्यकर्ता झाल्या पासून मी प्रचारानिमित्त नेहमी कन्नड ला येत होतो त्यामुळे कन्नडचे अन् माझे जवळचे नाते असून इथल्या शिवसैनिकांवर विशेष प्रेम आहे. असे प्रतिपादन नवनिर्वाचित पालकमंत्री आमदार संजय शिरसाट यांनी केले ते पिशोर येथे दि. १ मार्च रोजी आमदार संजना जाधव यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या नागरिक सत्काराच्या निमित्ताने रात्री ८ वा .कन्नड शहरात आले असता पिशोर नाका येथे यावेळी शहरातील नागरिकांचा सत्कार स्वीकारताना ते बोलत होते.

यावेळी आ संजना जाधव, जिल्हाप्रमुख भरतसिंग राजपूत, महिला आघाडी च्या प्रतिभा जगताप, पुष्पा गव्हाणे, सोनाली घाटबळे, जयेश बोरसे उपसभापती, मा. नगरसेवक संतोष पवार, कैलास जाधव, रत्नाकर पंडित, अशोक दाबके सरपंच, शिवाजी थेटे, माजी उपनगराध्यक्ष डॉ सदाशिव पाटील, विश्वनाथ त्रिभुवन, अशोक वाहूळ, मनोज, देशमुख, काकासाहेब कवडे, साईनाथ अल्हाड, सुधाकर पवार, आदीत्य गजे, ज्ञानेश्वर निकम, राम पवार, रामराव राठोड, श्रीराम घुगे, चंद्रकांत लाडे, सलमान शेख लक्ष्मीकांत सुरे विभाग प्रमुख प्रकाश काचोळे उदय सोनवणे विकास बनकर शेखर शिंदे संदीप घोंगडे, सिद्धार्थ निकाळजे, च्यासह मोठ्या संख्येने शिवसैनिक उपस्थित होते.

## जेईएसमध्ये राष्ट्रीय परिषदेचा भित्तीपत्रकाचे विमोचन



**जालना ता. १ (प्रा. डॉ. राजेंद्र सोनवणे) :** येथील, जेईएस महाविद्यालयाचे क्रीडा विभागाचा वतीने २ दिवसीय राष्ट्रीय परिषदेचे भित्तीपत्रकचे विमोचन करण्यात आले. या महिन्यात दि. २८ ते २९ मार्च रोजी जेईएस महाविद्यालय क्रीडा विभाग आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर यांच्या संयुक्त विद्यमाने या राष्ट्रीय परिषदेचे आयोजन होणार आहे, या दोन दिवशीय परिषदेचे स्वरूप अंतर विद्याशाखीय असून यात शिक्षण शास्त्र, शारीरिक शिक्षण व क्रीडा, योग व इतर सर्व शैक्षणिक संकुलाचे शिक्षक व विद्यार्थी भाग येऊ शकतात तसेच दोन दिवशीय परिषदेत शैक्षणिक व क्रीडा विषयी चर्चा व शोध पत्र सादर होणार आहे व उत्कृष्ट शोध पत्रांना पुरुस्कार देण्यात येणार आहे.

यात विशेष म्हणुन महाविद्यालयीन व शालेय विधार्थी देखील सहभाग घेऊन शकतात त्यांचा साठी विविध उपक्रमांचे आयोजन देखील करण्यात येणार आहे, असे यावेळी बोलतांना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री यांनी सांगितलेयावेळी क्रीडा संचालक डॉ.हेमंत वर्मा, आय क्यू एस सी चे संचालक डॉ. गणेश रोकडे डॉ. गणेश कुलकर्णी, डॉ. सुशांत देशमुख , डॉ.एस जे इंदूरकर ,डॉ. भाग्यश्री बियाणी उपस्थित होते.

## संजय राऊत यांच्यामुळे आनंद दिघेंना टाडा लागला खासदार नरेश म्हस्केंचा खळबळजनक दावा





**ठाणे :** संजय राऊत यांनी लिहिलेल्या एका लेखामुळे स्वर्गीय आनंद दिघे यांना टाडा लागला होता, असा खळबळजनक दावा शिवसेना शिंदे गटाचे नेते व खासदार नरेश म्हस्के यांनी केला आहे. तसेच या संजय राऊत यांनी दिघे साहेबांना हार घालायची भाषा करू नये, असेही नरेश म्हस्के म्हणाले आहेत. ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील शिवसेना ठाकरे गटाचा पदाधिकाऱ्यांचा मेळावा झाला, यावेळी संजय राऊत आनंद दिघे यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यासाठी जाणार होते, यावर नरेश म्हस्के यांनी टीका केली आहे.

खासदार नरेश म्हस्के म्हणाले, खोपकर हत्याकांडा नंतर संजय राऊत यांनी लोकप्रभामध्ये एक लेख लिहिला होता. त्या लेखामुळे आनंद दिघे यांना टाडा लागला. त्यांना तुरुंगात जावे लागले. आता त्या संजय राऊत यांनी दिघे साहेबांना हार घालायची भाषा करू नये. काशिनाथ घाणेकर नाट्यगृहाला आनंद दिघे यांचे नाव देण्याला विरोध करणाऱ्यांनी दिघे साहेबांचा पुतळ्याला पुष्पमाळ घालायची भाषा करू नये.

पुढे बोलताना नरेश म्हस्के म्हणाले, महाभारतात धृतराष्ट्र यांच्या जोडीला संजय होते. त्यांना दिव्यदृष्टी होती. हे संजय जर स्वतःला संजय समजत असतील तर त्यांनी जनतेच्या मनात काय आहे, त्याचाच विचार करावा. हे रात्रीच भांडुपच्या हातभट्टीची घेतात. त्यामुळे त्यांना स्वप्नातही एकनाथ शिंदे दिसतात. रात्रीची उतरली नसेल म्हणून सकाळी ते एकनाथ शिंदे यांच्याबाबत बोलले असतील. उद्धव ठाकरे आणि त्यांच्या नेतृत्वाखाली जो पक्ष आहे, ती शिल्लक सेना आहे. ही सेना त्यांनी सोनिया गांधींकडे गहाण ठेवली आहे. बाळासाहेबांचा हिंदुत्ववादी पक्ष सोनिया गांधींकडे गहाण ठेवला होता, तो एकनाथ शिंदे यांनी सोडवला.

नरेश म्हस्के पुढे म्हणाले, सावरकर यांची शपथ घेणाऱ्यांना मला एक सांगायचे आहे ज्यांनी सावकारांबद्दल अपशब्द वापरले, त्यांना शिव्यांची लाखोली वाहिली त्या राहुल गांधी यांचे कपडे धुण्याचे काम तुम्ही का करत आहात? असा सवाल नरेश म्हस्के यांनी उपस्थित केला. शिवसेना उबाठाची अवस्था बिकट आहे. त्यांच्याकडचे नगरसेवकसुद्धा आता पक्ष सोडून जात आहेत. यामुळे ठाण्यामध्ये १०० ते १५० माणसे बसतील एवढ्याच हॉलमध्ये त्यांना मेळावा घ्यावा लागत आहेत.




# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार ०३ मार्च २०२५


## डॉ. सौ. इं. भा. पा. महिला महाविद्यालयात 'शिवजयंती' निमित्त विविध उपक्रम संपन्न




**छत्रपती संभाजीनगर :** डॉ. सौ. इं. भा. पा. महिला महाविद्यालयात इतिहास विभागाद्वारे छत्रपती शिवाजी महाराजांच्या ३९५ व्या जयंती निमित्त छत्रपती शिवाजी महाराजांच्या चरित्रावर आधारित प्रश्नमंजुषा स्पर्धेचे व शिवचरित्रावर आधारित विविध उपक्रम या दोन्ही स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.

यावेळी व्यासपीठावर कार्यक्रमाच्या अध्यक्ष महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या मा. डॉ. सुनंदा चक्रनारायण, इतिहास विभागप्रमुख डॉ. सुषमा देशपांडे, कनिष्ठ महाविद्यालयाच्या पर्यवेक्षक प्रा. माधुरी भावसार, इतिहास विषयाचे प्रा. डॉ. प्रभाकर गायकवाड, प्रा. कविश्री देशमुख यांची उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या पहिल्या सत्रात प्रश्नमंजुषा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले यात मोठ्या संख्येने विद्यार्थिनींनी सहभाग घेतला. तर दुसऱ्या सत्रात छत्रपती शिवाजी महाराजांच्या चरित्रावर आधारित विविध प्रसंगाचे सादरीकरण यात शिवप्रतिमा पूजनाने सुरवात होऊन प्रथम इतिहास विभाग प्रमुख डॉ. सुषमा देशपांडे यांनी आपल्या प्रास्ताविकातून दरवर्षी इतिहास विभागातर्फे घेण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांचा आढावा घेतला. विद्यार्थ्यांनींच्या सर्वांगीन विकासासाठी दरवर्षी इतिहास विभागातर्फे विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येते. शिवजयंती निमित्त विविध स्पर्धांच्या आयोजनातून विद्यार्थ्यांनींपर्यंत छत्रपती शिवाजी महाराजांचे चरित्र त्यांची कामगिरी, त्यांचा पराक्रम, स्वराज्य स्थापन करण्यासाठी केलेले प्रयत्न पोहचावे व त्यातून विद्यार्थनींनी प्रेरणा घ्यावी हा त्यामागे उद्देश असल्याचे यावेळी त्यांनी सांगितले.

त्यानंतर छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनावर आधारित विविध प्रसंगांचे सादरीकरणात यात पोवाडा, नृत्य, लाठी काठी साहसी प्रकार, गायन स्वगत, नाटक याद्वारे अतिशय उत्कृष्ट प्रकारे शिवचरित्राचे दर्शन विद्यार्थिनींनी घडविले .

दोन्ही स्पर्धेतील विजेत्यांना यावेळी पारितोषिके प्रदान करण्यात आली यात प्रश्नमंजुषा स्पर्धेत प्रथम क्रमांक (बी. ए. द्वितीय वर्षाची कु.कल्याणी ललोखंडे), द्वितीय क्रमांक (बी. ए प्रथम वर्षाची कु. धनश्री पुरे ) व तृतीय क्रमांक ( इयत्ता १२ ची कु. अमृता गायके) या विद्यार्थिनींना आणि शिवचरित्रावर आधारित प्रसंगांचे सादरीकरण स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थिनींना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिके प्रदान करण्यात आली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षीय समारोपात महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या मा. डॉ. सुनंदा चक्रनारायण यांनी इतिहास विभागाद्वारे अतिशय सुंदर प्रकारे शिवजयंतीचा कार्यक्रम घेण्यात आल्याबद्दल विभागाचे अभिनंदन केले . छत्रपती शिवाजी महाराजांचे चरित्र हे सर्व विद्यार्थिनींसाठी प्रेरणादायी असल्याचे सांगून असे उपक्रम महाविद्यालयात आयोजित होणे गरजेचे असल्याचे सांगितले.

सांस्कृतिक कार्यक्रमाचे परीक्षण डॉ. दिलीप दोडके व डॉ. पराग चौधरी यांनी तर प्रश्नमंजुषा स्पर्धेचे परीक्षण प्रा. अश्विनी शहाणे, डॉ. वैशाली पाटील व प्रा. सुजाता कनके यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन कु.वैष्णवी ठोंबरे हिने केले तर आभार कु. साक्षी ढवळाणपुरे मानले.

कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी इतिहास विभाग प्रमुख डॉ. सुषमा देशपांडे, प्रा. कविश्री देशमुख, कनिष्ठ महाविद्यालयाचे डॉ. प्रभाकर गायकवाड यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाची सांगता शिवगर्जना व राष्ट्रगीताने झाली.

## नागनाथ पाटील हा व्यवस्थेला प्रश्न विचारणारा लेखक - डॉ. जगदीश कदम



**छत्रपती संभाजीनगर :** लेखकाने व्यवस्थेला निर्भिडपणे सामोरे जाऊन भिडले पाहिजे, इथली व्यवस्था आम्हाला पंगू करू पहात आहे. व्यवस्थेचा कोथळा बाहेर काढला पाहिजे. सुदैवाने नागनाथ पाटलांच्या सर्व कादंबऱ्यांमधून लेखक व्यवस्थेला प्रश्न विचारतो ही समाधानाची बाब आहे असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक डॉ. जगदीश कदम यांनी केले.

डॉ. जगदीश कदम हे मुक्त सृजन संस्थेच्या वतीने आयोजित "डॉ. नागनाथ पाटील यांची कादंबरी" या विषयावरील चर्चासत्रात अध्यक्षीय समारोपात बोलत होते. मसापच्या सभागृहात आयोजित या चर्चासत्राचे उद्घाटन सुप्रसिद्ध साहित्यिक आणि मराठवाडा साहित्य परिषदेचे कार्यवाह डॉ. दादा गोरे यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाच्या सुरूवातीला मुक्त सृजन संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. महेश खरात यांनी प्रास्ताविक केले.

पुढे बोलताना डॉ. कदम म्हणाले व्यवस्थेला भिडून, निकराने झुंज दिले पाहिजे असे सांगून नागनाथ पाटील हे बहुभाषिक असून खरं तर ते मराठवाडा ऐवजी पूण्यात राहिले असते तर आणखी उंची गाठली असती. डॉ. नागनाथ पाटील यांच्या 'लंबाडी' या कादंबरीवर एकता महाविद्यालय बीडकीनच्या मराठी विभाग प्रमुख डॉ. अर्चना सोनवणे-काटकर यांनी भाष्य केले तर चर्चक प्रा. प्रीती योसेफ बनकर नाशिक यांनी आपले मत व्यक्त केले. 'कोंडणातलं जिणं' या कादंबरीवर देगलूर महाविद्यालयाचे मराठी विभाग प्रमुख डॉ. विठ्ठल जंबाले यांनी भाष्य केले तर कादंबरीकार डॉ. रमेश रावळकर यांनी चर्चक म्हणून उत्तम मांडणी केली. 'हुतराणी' या कादंबरीवर ज्येष्ठ साहित्यिक भास्कर निर्मळ पाटील यांनी भाष्य केले. तर य. च. महाविद्यालय सिल्लोडचे मराठी विभाग प्रमुख डॉ. ज्ञानेश्वर शेजूळ यांनी चर्चक म्हणून आपले मत मांडले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. संतोष देशमुख यांनी केले. तर हनुमंत सोनावणे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

## फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलच्या वतीने वैचारीक प्रबोधनात्मक कार्यशाळेचे आयोजन.

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी) :** आपण सर्वांनाच ज्ञात आहे की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १ मार्च १९३६ ला "चळवळीचा फायदा सर्वांनाच झाला आहे." असे म्हटले होते तर १ मार्च १९३१ ला "स्वराज्यात अस्पृश्य जनतेला समान हक्काने राहता आले पाहिजे." त्या दोन्ही विधानाच्या वर्धापनदिनानिमित्त विषय : चळवळीचा फायदा सर्वांनाच झाला आहे. म्हणून स्वराज्यात अस्पृश्य (भारतीय) जनतेला समान हक्काने राहता आले पाहिजे. या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या १९३६ च्या विधानाच्या ८९ व्या व १९३१ च्या ९४ व्या वर्धापनदिनानिमित्त विषयावर फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलच्या वतीने ९७ व्या वैचारीक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळेचे दिनांक २ मार्च २०२५, रविवारला दुपारी २:३० वाजता आयोजन करण्यात आले आहे. तरी आपण सर्व मानवतावादी व्यक्तींनी फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलचे जणसंपर्क कार्यालय : प्लॉट क्रमांक : ४, साकेत नगर, भावसिंगपुरा रोड, छत्रपती संभाजी नगर, महाराष्ट्र येथे उपस्थित राहावे. या कार्यशाळेला सामाजिक कार्यकर्ते समाधान ओंकार इंगळे सर उद्घाटनपर मार्गदर्शन करणार आहेत. पीईएसआर महाविद्यालयाचे प्राचार्य दिलीप वर्घट हे प्रमुख वक्ते म्हणून मार्गदर्शन करणार आहेत. तसेच डिलीट दि दलित या पुस्तकाचे लेखक अनिल सोनकामळे यांचे विशेष मार्गदर्शन लाभणार आहे. ही कार्यशाळा संचालक बी. बी. मेश्राम यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न होणार आहे.

सर्व उपस्थित प्रतिनिधींना या कार्यशाळेत आपले मत व्यक्त करण्याची संधी दिली जाणार आहे. तरी सर्व मानवतावादी नागरिकांनी या कार्यशाळेला उपस्थित राहून आपले म्हणणे उपस्थितांना समजावून सांगावे, पटवून द्यावे आणि इतरांचे म्हणणे समजून घ्यावे.


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.

कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.

संपर्क क्र. 7588005002